चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

७ मार्च, २०१९

☎ : 07172-264300
: 07172-255800
✍: 7276494810 (PRO)

## चंद्रपूर पोलीसांची अवैध दारूविक्री करणाऱ्यांवर कार्यवाही

जिल्हयात दारूबंदी घोषीत झाल्यापासुन अवैध दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्यांवर चंद्रपूर जिल्हा पोलीस प्रभावी कार्यवाही करण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेत आहे. यादरम्यान दिनांक ०६/०३/२०१९ रोजी जिल्हयातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत नाकेबंदी आणि छापे टाकुन अवैध दारूचा साठा जप्त करण्यात पोलीसांना यश प्राप्त झाले आहे.

यामध्ये जिल्हयातील पोलीस स्टेशन **चंद्रपुर शहर, घुग्घुस, बल्लारशाह, वरोरा, माजरी, शेंगाव, ब्रम्हपुरी, भिसी, चिमुर, तळोधी, पोंभुर्णा** अंतर्गत संबधीत पोलीस पथकाने प्रभावी कार्यवाही करीत दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्याच्या विरूध्द जिल्हयात एकुण **१७** गुन्हयाची नोंद करण्यात आली आहे. सदर गुन्हयात एकुण **५,२४,६००/—रू.** चा मुददेमाल हस्तगत करण्यात आला आहे. पुढिल तपास संबंधीत पोलीस स्टेशन करीत आहे.

---

## चंद्रपर पोलीसांची जुगार खेळणाऱ्यांवर कार्यवाही

**१)पोलीस स्टेशन गडचांदुर :—**

दिनांक **०६/०३/२०१९** रोजी पोलीस स्टेशन **गडचांदुर** अंतर्गत ०१ आरोपी ईसम हा सटट्ापटट्ीच्या आकडयावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगाराचा खेळ खेळताना मिळुन आल्याने पो.स्टे. **गडचांदुर** येथे अप. क्र. **७४/२०१९** कलम १२ (अ) मुंबई जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील ०१ आरोपीस अटक करण्यात आले असुन घटनास्थळावरून जुगारच्या साहीत्यसह नगदी असा एकुण **१,७१०/—रू.** चा माल हस्तगत करण्यात आला आहे. पुढील तपास **गडचांदुर** पोलीस करीत आहे.

---

☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
: 7276494810 (PRO)

# जबरी चोरीतील फिर्यादीच निघाला आरोपी

## विरूर पोलीसांनी केला गुन्हयातील ३ लक्ष ५३ हजाराचा माल हस्तगत

दिनांक ०३/०३/२०१९ रोजी पोलीस स्टेशन विरूर येथे फिर्यादी नामे ज्ञानेश्वर बापु माहुलकर वय १७ रा. रानवेल्ली, कवठाळा, ता. शिरपुर, जि. कोमरामभीम तेलंगाना, यांनी पोस्टे ला तक्रार दिली की, ते आणि त्याचा चालक नामे तुळशिराम मनोहर आउतकर वय २६ रा. कन्नेपल्ली, कवठळा, ता. शिरपुर,जि. कामरामभिम तेंलंगाना, हे त्यांचे ताब्यातील आयशर वाहन क्रमांक एपी ०१ वाय ४५०० याने सालासर जिनींग मधुन आसीफाबाद रोडने परत येत असतांना तिन अज्ञात इसमांने त्यांचे वाहन थांबवुन चाकुचा धाक दाखवुन त्यांचे जवळील ३,५३,०००/—रू चोरून नेले. अशा फिर्यादीच्या रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन विरूर येथे अप.क्र. ४६/२०१९ कलम ३९२, ३४ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

गुन्हा नोंद होताच विरूर येथील पोलीस पथक यांनी तपासाला सुरूवात केली. तपासादरम्यान फिर्यादी आणि वाहन चालक यांचे वेगवेगळे बयाण नोंद करण्यात आले. बयाण नोंदवितांना पोलीसांना लक्षात आले की, फिर्यादी आणि चाल

क हे घटनेच्या वेळेस सोबत असुन सुध्दा त्यांच्या बयाणात तारतम्य जुळत नाही. यावरून पोलीस पथकास त्यांच्यावर दाट संशय आल्याने यातील वाहन चालकास दिंनाक ०५/०३/२०१९ रोजी अटक करून त्याचा न्यायालयाकडुन पोलीस कोठडी रिमांड घेण्यात आला. या दरम्यान सदर आरोपीची कसुन चौकशी केली असता, आरोपी वाहन चालक नामे १) **तुळशिराम मनोहर आउतकर** आणि आरोपी नामे २) **संतोष गोंडु येलमुले जि. कोमरामभिम तेंलंगाना** यांनी हा सदरचा कट रचुन गुन्हयातील ३,५३,०००/—रू ची चोरी केल्याची कबुली दिल्याने संतोष येलमुले यास सुध्दा अटक करण्यात आली. चोरी करून आरोपीतांनी गुन्हयातील चोरी केलेले पैसे हे त्याचा मित्र संतोष येलमुले याला दिल्याचे तपासात समोर आल्याने आरोपी नामे ३) **संतोष येलमुले** यास अटक करण्यात आली असुन गुन्हयातील चोरीची रक्कम हस्तगत करण्यात आली आहे. सदरचा गुन्हा या तिन्ही आरोपींतानी संगणमत आणि कट रचुन घडवुन आणला आणि पोलीसांची दिशाभुल केल्यावरही पोलसांनी आपली समयसुचकता आणि तत्परता दाखुवन गुन्हयातील तिनही आरोपींना अटक करून गुन्हा उघडकीस आणला आहे.

सदरचा तपास पोलीस अधीक्षक चंद्रपुर श्री. महेश्वर रेडड्ी, यांचे मार्गदर्शनात, उपविभागीय पोलीस अधिकारी राजुरा श्री. शेखर देशमुख, यांचे नेतृत्वात पोलीस स्टेशन विरूर सपोनि. श्री. कृष्णा तिवारी, सफौ. सफदरखॉं पठाण, पोहवा. सचिन पडवे, पोशि. प्रशांत बावणे, पोशि. सुरेंद्र काळे, भगवान मुंडे, राकेश फुकट यांनी मोलाची कामगीरी केली.

—————————————————————————————————